प्रकरण पहिले :

# उपोद्‌घात


| | | |
|---|---|---|
| १.१. | प्रस्ताविक | पृ. १ |
| १.२. | संशोधनविषय निवडण्यामागील भूमिका | पृ. १ ते पृ. ४ |
| १.३. | वापरलेल्या संशोधन पध्दती व स्वीकारलेले धोरण | पृ. ४ |
| १.४. | प्रबंधिकेची क्रमश: मांडली | पृ. ५ |
| १.५. | समारोप | पृ. ५ |

प्रकरण पहिले :

# उपोद्घात

## १.१. प्रस्ताविक :

प्रस्तुत प्रबंधिकेच्या 'उपोद्घात' हया पहिल्या प्रकरणामध्ये संपूर्ण प्रबंधिकेच्या सर्व प्रकरणांची प्राथमिक स्वरुपात माहिती घ्यावयाची आहे. हयामध्ये संशोधनविषय निवडण्याच्या भूमिकेपासून प्रबंधिकेची क्रमशः मांडणी कशा प्रकारे आहे, हयाची माहिती जाणून घ्यावयाची आहे.

## १.२. संशोधनविषय निवडण्यामागील भूमिका :

मी ग्रामीण भागातील विदयार्थी असून कांदबरीवाचन हा माझा छंद आहे. विशेषतः समकालीन जीवनाचा वास्तववादी वेध घेणाऱ्या कादंबऱ्या मी अधिक प्रमाणात वाचत आलो आहे. साठोत्तरी मराठी कादंबरी ही प्रामुख्याने भालचंद्र नेमाडे हयांच्या 'कोसला' (१९६३) हया आगळ्यावेगळ्या कादंबरीमुळे प्रभावित झाली आहे. नेमाडे हयांच्या कोसलासह सर्व कादंबऱ्या मी वाचल्या. त्याचबरोबर इतरही कादंबरीकारांच्या तशा प्रकारच्या कादंबऱ्या मी वाचल्या. अनंत कदम हे त्यापैकी एक अधिक महत्त्वाचे कादंबरीकार होत. विशेषतः 'किडे' (१९७१) व 'कॅन्सर' (१९८२) हया त्यांच्या दोन कादंबऱ्या मला अधिक महत्वाच्या वाटल्या साठोत्तरी काळातील बदलते समाजजीवन, बदलती तरुण पिढी, बदलत्या समस्या हया सर्वांचे वास्तववादी चित्रण हया दोन कादंबऱ्यांमधून आलेले आहे. हया दोन कादंबऱ्यानी माझ्यासारख्या विदयार्थीदशेतील अभ्यासकाचेही लक्ष वेधून घेतले आहे. म्हणून 'अनंत कदम हयांचे कादंबरीलेखन'

[किडे' (१९७१) व 'कॅन्सर' (१९८२) हया दोन कादंबऱ्यांच्या अनुषंगाने] हा संशोधन विषय मी निवडला.

मराठी कादंबरीची वाटचाल एकोणिसाव्या शतकात सुरु झाली व ती वेगवेगळी टप्पे ओलांडत अधिकाअधिक समृध्द व संपन्न होत गेली साठोत्तरी कालखंडातील व्यक्तिजीवनातील व समाजजीवनातील उलटापालट साठोत्तरी कादंबरीतून नेमकेपणाने चित्रीत झाली. हयात अधिक यशस्वी, अधिक प्रभावी व महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून भालचंद्र नेमाडे, जयवंत दळवी, पु.शि.रेगे, कमल देसाई, चिं.त्र्यं, खानोलकर, किरण नगरकर, दीनानाथ मनोहर आदींचा उल्लेख करण्यात येतो. अनंत कदम हे साठोत्तरी काळातील असेच एक महत्त्वाचे कादंबरीकार होत. त्यांनी कादंबरीलेखनाबरोबर काव्यलेखनही केलेले आहे. 'बासरी' (१९६९), 'ती पहाट येत आहे' (१९९५०,) 'झुरते पाखरु' (१९९५) आणि 'हृदयताल' (१९९९) हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. अनंत कदम हयांनी आजपर्यंत १५ कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. त्यामध्ये 'स्त्रोत' (१९७७), 'पाखरु' (१९७९), 'दिवसातल्या अंधारात' (१९८०), 'मानवी' (१९८३), 'संवाद' (१९८४), 'विचित्र' (१९९०), 'मरण' (१९८१), 'विद्यापीठ' (१९९३), 'कुंपणा पलीकडे' (१९९४), 'नामरुप' (२०००), 'कणा' (२०००), आणि 'पुत्र राक्षसाचा' (२००४) हया कादंबऱ्यांचा समावेश होतो. हयाचबरोबर त्यांनी काही अनुवादही केले आहेत. 'धम्मपद' हे अनुवादलेखन १९९२ साली प्रकाशित झाले, तर 'माय, बाप आणि. . .' हे व्यक्तिचित्र १९९५ साली प्रकाशित झाले. त्यांचे हे सर्व लेखन सामान्य वाचकांबरोबर चोखंदळ अभ्यासकांचेही लक्ष वेधणारे ठरले आहे.

अनंत कदम हयांनी 'विपुल' कादंबरीलेखन केले आहे. मात्र 'किडे' (१९७१) व 'कॅन्सर' (१९८२) हया त्यांच्या दोन कादंबऱ्या अधिक लक्षवेधक, उल्लेखनीय व महत्त्वपूर्ण आहेत. 'किडे' हया कादंबरीमध्ये एक सरळमार्गी तरुणाची शोकांतिका अनंत कदम हयांनी प्रभावीपणे चित्रित केली आहे. मुंबईमध्ये कस्टम खात्यामध्ये प्रिव्हेंटिव्ह ऑफिसर हया चांगल्या हुद्दयावर हा तरुण नोकरी करीत असतो. परंतु त्याला त्याचे सहकारी कटकारस्थान करुन लाचलुचपतीच्या खोटया प्रकरणामध्ये अडकवतात. त्यातून त्याची नोकरी जाते. नोकरी गेल्यानंतर तो अत्यंत निराश व वैफल्यग्रस्त होतो. आपल्या कुटुंबातील व आपल्या अवतीभवतीच्या समाजातील व्यक्ती आपापल्या स्वार्थ साधण्यासाठी नैतिक मूल्यांचा बळी देऊन निर्लज्जपणे तडजोडीचे जीवन पसंत करत असतात. ही गोष्ट हया सरळमार्गी, अविवाहित तरुणाला पसंत नसते. अनंत कदम हयांची 'कॅन्सर' (१९८२) ही सुध्दा अशीच समकालीन वास्तवाचा भेदकपणे वेध घेणारी कादंबरी आहे. हया कादंबरीचा नायक हृदयनाथ पांडुरंग भोसले हा मराठा जातीतील असून इंग्रजी विषय घेऊन तो एम्.ए. झालेला असतो. इंग्रजी विषयाचा प्राध्यापक म्हणून नोकरी करताना एका मुस्लीमधर्मीय विदयार्थीनीशी तो प्रेमविवाह करतो. हया घटनेनंतर त्याच्या आयुष्याची फरफट सुरु होते. त्यातून त्याला नोकरी व घर सोडून जावे लागते. नंतर एका खेडेगावातील हायस्कूलमध्ये त्याला हेडमास्तराची नोकरी मिळते. परंतु तेथेही तो टिकून राहू शकत नाही. नंतर नाईलाज होऊन विद्यापीठामध्ये कारकुनाची नोकरी तो स्वीकारतो. हया तिन्ही नोकऱ्या करत असताना त्याला आपले सहकारी किती खालच्या पातळीवर येऊन स्वत:चा स्वार्थ साधत असतात, ते जवळून पहावयास मिळते. शिक्षण क्षेत्रातील वाईट प्रवृत्तीच्या दर्शनामुळे एकामागून एक धक्के बसत जातात. स्वत: त्याला

कॅन्सर झाल्याचे डॉक्टरकडून कळते. आपल्या अवतीभवतीच्या समाजालाही कॅन्सरच झालेला आहे. असे त्याचे मत बनते हयामुळे तो अत्यंत हताश होतो.

अशा प्रकारे अनंत कदम हयांनी ‘किडे’(१९७१) व ‘कॅन्सर’ (१९८२) हया आपल्या दोन कादंबऱ्यांमधून महानगरात राहणाऱ्या सुशिक्षित व सरळमार्गी तरुणांच्या माध्यमातून समाजातील अपप्रवृत्तींचा वेध घेतला आहे. हया दोन्ही कादंबऱ्या वाचकाला अस्वस्थ करणाऱ्या आहेत. शिवाय अंतर्मुख होऊन विचार करावयास लावणाऱ्याही आहेत.

## १.३. वापरलेल्या संशोधन पद्धती व स्वीकारलेले धोरण :

अनंत कदम हयांचे कादंबरीलेखन हा संशोधन विषय अभ्यासताना मी प्रामुख्याने समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय अशा दोन संशोधनपद्धतींचा अवलंब केला आहे. त्यामुळे अनंत कदम हयांच्या कादंबरीलेखनातील सामाजिक वास्तव व त्या वास्तवामागील कारणे नेमकेपणाने लक्षात आणून देणे शक्य झाले. साहित्य हा समाजचा आरसा असतो. त्यामुळे समाजाचे प्रतिबिंब साहित्यात पहावयास मिळते. अनंत कदम हयांच्या कादंबरीलेखनासंदर्भात हे तत्व तंतोतंत लागू पडते. विशेषत: ‘किडे’ (१९७१) व ‘कॅन्सर’ (१९८२) हया त्यांच्या दोन कादंबऱ्या संदर्भात हे तत्त्व अधिक लागू पडते. म्हणून हया दोन कादंबऱ्यांच्या अनुषंगाने अनंत कदम त्यांचे कादंबरीलेखन अभ्यासण्याचे धोरण मी स्वीकारले. अर्थात् अन्य साठोत्तरी मराठी कादंबरीकार व त्यांचे कादंबरीवाङ्मय हयांचा संदर्भही मी पहात गेलो आहे.

## १.४. प्रबंधिकेची क्रमशः मांडणी :

प्रस्तुत प्रबंधिकेची क्रमश: मांडणी पुढील प्रमाणे करण्यात आली आहे

१. उपोद्‌घात

२. मराठी कादंबरीची वाटचाल व तिच्यातील साठोत्तरी कादंबरीचे स्थान

३. अनंत कदम हयांच्या कादंबऱ्यांमधील अनुभव विश्व

४. अनंत कदम हयांच्या कादंबऱ्यांमधील व्यक्तिरेखा

५. अनंत कदम हयांच्या कादंबऱ्यांमधील वातावरणनिर्मिती व भाषाशैली

६. अनंत कदम हयांचे मराठी कादंबरीवाङ्:मयातील स्थान

७. उपसंहार

## १.५. समारोप :

अशा प्रकारे संशोधनविषय निवडण्यामागील भूमिका, त्यासाठी वापरलेल्या संशोधन पध्दती व स्वीकारलेले धोरण, तसेच प्रबंधिकेची मांडणी हे सर्व काही येथे आपण पाहिले.